# <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.१२३/२०२१ मधील नि.१४ खालील आदेश</u>
# <u>(CNR-MHSN090008412021)</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे नि.५ कडील तुर्तातुर्त मनाई अर्ज दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाई करिता दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ५ यांना दाव्याचे समन्स व तुर्तातुर्त अर्जाची नोटीस पाठविली होती परंतु, प्रतिवादी क्र. ५ हा त्याचे नाव कृष्णा पोपट माने नसुन त्याचे खरे नाव हे सौरभ पोपट माने असे सांगत आहे व तसा बेलिफ रिपोर्ट देखील आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ चे नावामध्ये दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने जरुरी आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ चे नावामधील 'कृष्णा' यावर काट मारुन त्या ठिकाणी 'सौरभ' असे लिहिणेस व दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वरीलप्रमाणे दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची असून दाव्याचे तसेच अर्जाचे मुळ स्वरुप बदलत नाही. तसेच, अशी दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही. परंतु जर दुरुस्ती झाली नाही तर वादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे त्यामुळे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

४. प्रस्तूत अर्जास प्रतिवादी यांना संधी देवूनही त्यांनी आपले म्हणणे सादर केले नाही, म्हणून प्रस्तूत अर्ज प्रतिवादी यांचे म्हणणेविना चालविणेत आला.

५. अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदी करिता दाखल केला आहे. वादीने प्रस्तूत अर्जात केलेली मागणी मध्ये प्रस्तुत कामात प्रतिवादी क्र. ५ यांना पाठविलेल्या दाव्याचे समन्स व तुर्तातुर्त ताकीद अर्जाची नोटीस मध्ये प्रतिवादी क्र. ५ हा त्याचे नाव कृष्णा पोपट माने नसुन त्याचे खरे नाव हे सौरभ पोपट माने असे सांगत असल्याचे नमुद केले आहे. <u>निशाणी १०</u> कडील बेलिफ रिपोर्ट पाहिला असता त्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ हा त्याचे नाव कृष्णा पोपट माने नसुन त्याचे खरे नाव हे सौरभ पोपट माने असे सांगीतले असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादीने प्रस्तूत अर्जास म्हणणे सादर न केल्याने प्रस्तूतचा अर्ज विनाआव्हानीत राहिला आहे. सबब वादी मागत

असलेली दुरुस्ती योग्य व न्यायोचित आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही व अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट नि.५ कडील अर्जाच्या गुणदोषात्मक व अंतिम न्यायनिर्णयाकरिता वादी मागत असलेली दुरुस्ती मंजूर करण्याच्या निष्कर्षास मी आले आहे. सबब या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादीचा नि.१४ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात मागितलेली दुरुस्ती विहीत मुदतीत करुन घ्यावी.

**सही/-०८.०९.२०२१**

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.०८.०९.२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | D.S. Pawar. |
| Court | : | 2nd Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 08.09.2021 |
| Order signed by the Presiding officer on | : | 08.09.2021 |
| Order uploaded on | : | 09.09.2021 |